ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादी
विषयांस वाहिलेले
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारी
प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार ७ डिसेंबर, १९६६ | अंक २२

## शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें

भारतांतील निरनिराळ्या राज्यामधून वीज निर्मितीच्या योजना कार्यवाहीत आल्यामुळें शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें खुलीं झालीं आहेत. आज खेड्यापाड्यांतून शेतीसाठीं लिफ्ट इरिगेशन, शहरी व ग्रामीण पाणी पुरवठा व इतर लहानमोठ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा किर्लोस्कर पंपिंग सेटस कार्यक्षमतनें करूं शकतात. आपल्या योजनेसाठीं कोणता किर्लोस्कर पंप सेट निवडावा याबाबतचा तांत्रिक सल्ला आपल्याला आमचेकडून विनामूल्य मिळूं शकेल.






वैशिष्ट्यें :

- डबल सक्शन
- मजबूत बांधणी व दीर्घकाल टिकाऊ
- कार्यक्षम व काटकसरी
- झीज कमी व दुरुस्तीस सोपा

किर्लोस्कर

रजि. ट्रे. मा.



टाइप "यूपी"
५ ते ३०० हॉ. पॉ. पंपिंग सेट

उत्पादक

किर्लोस्कर ब्रदर्स लि.

किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली

### वन्य स्थितीतील सिंह पाहण्याची फी कमी केली

सौराष्ट्रातील गिरनारच्या जंगलात वन्य स्थितीतील सिंह सुरक्षित वातावरणात ठेवण्यात आले आहेत. आशिया खंडातील सिंह ह्या प्राण्याचे ते एकमेव सुरक्षित ठिकाण आहे. गिरनारच्या जंगलातील सिंह पाहण्यासाठी येण्यात येणारी फी गुजरात सरकारने अलीकडे कमी केली आहे. त्यामुळे हौशी प्रवाशांना पर्यटनास उत्तेजन मिळणार आहे. भारतामधील रम्य वनश्री परदेशीय प्रवाशांच्या दृष्टीने एक मोठे आकर्षण ठरलेले आहे. गिरनारमधील सिंह पाहण्यासाठी १९६० साली १० हजार परदेशीय प्रवासी सौराष्ट्रात गेले होते. १९६४ पर्यंत ह्या प्रवाशांची संख्या ३० हजारांपर्यंत वाढलेली आहे. खुद्द भारतामधील अधिक प्रवासी तिकडे आकर्षित करण्यासाठीही फी कमी केल्याचा उपयोग होईल. शिक्षण संस्थांमार्फत आलेल्या विद्यार्थ्यांच्या गटांसाठी राज्यसरकार सिंह दाखविण्याची मुद्दाम सोयही करते.

---

### नाझी पुढाऱ्यांची तुरुंगातून सुटका

दुसऱ्या महायुद्धानंतर हिटलरच्या प्रभावळीतील प्रमुख नाझी पुढाऱ्यांची युद्धगुन्हेगार म्हणून चौकशी करण्यात आली. त्यातील काहीजणांना फाशी देण्यात आले; कित्येकांना दीर्घ मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. अशांपैकी अल्बर्ट स्पीर ह्या गुन्हेगाराची नुकतीच सुटका करण्यात आली. त्याच्या कारावासाची मुदत संपली होती. अल्बर्ट स्पीर हा हिटलरच्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांचा उत्पादन-प्रमुख होता. पराभव डोळ्यापुढे दिसू लागल्यावर हिटलरने जर्मनीतील सर्व कारखाने व शेती उध्वस्त करण्याचा हुकूम दिला होता. परंतु स्पीरने तो न मानता जर्मनीची उरलीसुरली उत्पादनक्षमता राखली. हिटलरच्या हुकमाकडे दुर्लक्ष करण्यात असलेला धोका पत्करूनही त्याने जर्मनीच्या भविष्यकालासाठी हे केले.

---

### गुजरात राज्याचे शेंगदाण्यासंबंधी धोरण

शेंगदाणा आणि शेंगदाण्याचे तेल ह्यांसंबंधी गुजरात राज्य सरकार आपले धोरण बहुधा चालू महिन्याच्या अखेरीस जाहीर करील. राज्यातील शेंगदाणा उत्पादकांची एक बैठक भरविण्यात येणार असून तीत राज्यातील पिकाचा अंदाज घेण्यात येईल. शेंगदाण्याचे तेल गाळणाऱ्या कारखानदारांचीही एक सभा लवकरच बोलाविण्यात येणार आहे. सध्याच्या अंदाजाप्रमाणे राज्यातील शेंगाचे पीक सुमारे १२ लाख टन येईल आणि त्यापासून सुमारे ६ लाख भुईमुगाचे दाणे हाती लागतील. दाण्याच्या गळितापासून सुमारे ३ लाख टन गोडे तेल मिळू शकेल. गेल्या वर्षी अवघ्या २ लाख टन तेलाचे उत्पादन झाले होते. गुजरात राज्य तेलाच्या उत्पादनाच्या दृष्टीने सामान्यपणे शिलकी गणले जाते; इतर राज्यांना तेलाचा पुरवठा करण्यात गुजरातचा मोठा भाग असतो.

---

### अणुभट्ट्यांसाठी लागणाऱ्या इंधनाचा कारखाना

भारताच्या अणुशक्ती मंडळाने अणुभट्ट्यांत वापरावयाचे इंधन तयार करण्याचा एक कारखाना हैद्राबाद शहराजवळ काढण्याचे ठरविले आहे. कारखान्यात तयार होणारे इंधन राजस्तानातील प्रतापसागर अणुशक्ती केंद्र, मद्रासजवळील कालपाकम् आणि इतर अणुभट्ट्यांसाठी पुरविण्यात येईल. संकल्पित कारखान्याच्या उभारणीसाठी १० कोटी रुपये भांडवली खर्च येणार आहे; आणि त्यामधून दरसाल १०० टन आण्विक इंधन तयार होईल. १९६९ सालच्या मध्याच्या सुमारास ह्या कारखान्याची उभारणी पूर्ण होईल असा अंदाज आहे. कारखान्याच्या उभारणीच्या कामी कोणत्याही परदेशाचे साह्य घेण्यात येणार नाही. त्यामुळे त्याच्या वापरासंबंधी आंतरराष्ट्रीय पाहणीचा प्रश्नच उद्भवत नाही. आण्विक इंधन देशात तयार होऊ लागल्यावर बरेच परदेशीय चलन वाचेल.

---

### थर्मास बाटल्यांच्या पुरवठ्याचा करार

रशिया आणि भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्यांनी केलेल्या करारास अनुसरून भारत रशियाला ७५ हजार थर्मासच्या बाटल्या पुरविणार आहे. भारत सध्या मध्यपूर्वेकडील आणि अतिपूर्वेकडील देश ह्यांना बाटल्या पुरवीत आहे. पण, त्यांची संख्या फारशी मोठी नाही. भारताच्या ह्या बाजारपेठांतून अलीकडे जपानी थर्मासच्या बाटल्या येऊ लागल्या असून त्यांची स्पर्धा जाणवू लागली आहे. कारण, भारतापेक्षा जपानी बाटल्यांच्या किमती कमी आहेत. ह्या परिस्थितीमुळे रशियाची बाजारपेठ भारताला मिळाली तर हवी आहे. भारतीय थर्मासची परदेशात चांगली चहा होत आहे. त्यांचा सुबकपणा आणि दर्जा परदेशी मालाच्या तोडीचा आहे.

आमचे ग्राहक, आणि नाराज ?

छे: ! आम्ही बेळगाव बँकेतील कर्मचारी आमच्या ग्राहकांना केव्हाही नाराज होऊच देत नाही; मग त्यांचे आमच्याकडे कसल्याही प्रकारचे काम असो ! महाराष्ट्र व म्हैसूर राज्य आणि गोवा येथील आमच्या ३८ शाखांच्यामार्फत आपले कोणत्याही प्रकारचे बँकिंगचे काम करण्यास आम्ही तत्पर आणि उत्सुक आहो. तुमचा आमच्याशी व्यवहार म्हणजे उभयतांना पूर्ण समाधान !

दि बेळगांव बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३० )

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई ९.

# अर्थ

बुधवार, ७ डिसेंबर, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अवमूल्यनानंतर निर्यातीत घट झाली

भारतीय रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यानंतर निर्यात वाढेल अशी अपेक्षा होती. निदान निर्यातवाढीच्या हेतूने अवमूल्यनाचे धोरण स्वीकारण्यात आले होते. परंतु हे धोरण स्वीकारल्यानंतरच्या ४ महिन्यात म्हणजे जून ते सप्टेंबर ह्या कालात निर्यातीमुळे प्राप्त होणाऱ्या परदेशीय चलनात गेल्या वर्षीच्या ह्याच कालातील तुलनेने १० कोटी डॉलर्सची घट झालेली आहे. भारताच्या बोर्ड ऑफ ट्रेडसाठी सरकारच्या व्यापारखात्याने तयार केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. १९६६ च्या वरील कालावधीत भारताला निर्यात व्यापारामुळे ४६·३५ कोटी डॉलर्स मिळाले. १९६५ च्या ह्याच कालखंडात ५६·३६ कोटी डॉलर्सची प्राप्ती झाली होती. भारतामधून निर्यात होणाऱ्या मालात ताग, चहा आणि सुती कापड ह्यांना प्रमुख स्थान आहे. परंतु ह्या मालाची निर्यात कमी झालेली आहे. ह्याउलट कच्ची कातडी, कातड्याच्या वस्तू, मासे, लोकर, मॅंगेनीझ ह्या वस्तूंच्या निर्यातीत किंचित वाढ झालेली आहे. निर्यातवाढीसाठी योजण्यात आलेल्या उपायांचा अद्याप काही परिणाम झालेला आढळून आलेला नाही. तथापि, डिसेंबर महिनाअखेर अगर पुढच्या वर्षाच्या प्रारंभी ह्या उपायांचा परिणाम होऊन परदेशीय चलनाच्या प्राप्तीत वाढ होईल अशी आशा करण्यात येत आहे. अवमूल्यनानंतर निर्यातीत आपोआप वाढ होणे अर्थातच शक्य नाही. कारण, शेतीच्या मालाची टंचाई, कच्च्या मालाची टंचाई आणि उत्पादनाची वाढती किंमत ह्यांतून निर्यातीच्या घटीचे संकट ओढवले आहे. तेव्हा शेतीच्या व कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढ करून निर्यातीसाठी अधिक माल उपलब्ध करून देणे हाच एकमेव मार्ग आहे.

## अवमूल्यनानंतरच्या निष्क्रीयतेबद्दल इषारा

प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ प्रा. सी. एन्. वकील ह्यांनी नागपूर येथे एका प्रसंगी बोलताना रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यानंतर त्याचा फायदा पदरात पाडून घेण्यासाठी योजावयाचे उपाय न योजल्याबद्दल सरकारला इषारा दिला आहे. ते म्हणाले की, अवमूल्यन केल्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेची फेरजुळणी करणे आवश्यक होते. ती करण्यासाठी उत्पन्नावर मर्यादा घालून ती गोठविणे, उत्पादन वाढविणे, निर्यातीचा विस्तार करणे, इत्यादी उपाय अमलात आणावयास पाहिजे होते. परंतु अशा प्रकारचे उपाय योजण्यात दिरंगाई झाल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली असून देशाला नुकसानी सोसावी लागत आहे. आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यात समतोलपणा येण्यासाठी अवमूल्यनाचा मार्ग स्वीकारण्यात आला. त्यामुळे भारताची निर्यात वाढेल अशी अपेक्षा होती; पण उलट निर्यात कमीच झालेली दिसून येत आहे. परदेशांच्या बाजारपेठांत भारताचा माल स्वस्त किमतीत देता यावा आणि स्पर्धेला तोंड देता यावे असा हेतू अवमूल्यनामागे होता. परंतु देशातील वाढत्या किमती आणि निर्यातदारांनी निर्यातीसाठी प्रलोभन म्हणून रोख मदतीची केलेली मागणी ह्या कारणांनी हा हेतू सफळ झाला नाही. अवमूल्यन केल्यानंतर पहिल्या प्रथम वाढत्या किमतींना पायबंद घालण्याचे प्रयत्न व्हावयास पाहिजे होते. पण तसे प्रयत्न न होता अमूल्य वेळ राजकारणी भांडणे भांडण्यात वाया घालविण्यात आला. सरकारचा खर्च कमी करण्याची योजना आखण्यात आली, आणि त्याच वेळी सरकारी नोकरांचा महागाई भत्ता वाढविण्यात आला. त्यामुळे सरकारी खर्चाचा बोजा ८१ कोटी रुपयांनी वाढला. देशाचे आर्थिक धोरण कसे हाताळण्यात येते त्याचा हा एक नमुना आहे. ब्रिटनच्या मजूर सरकारनेसुद्धा राजकीय बाबींकडे दुर्लक्ष करून वेतने गोठविण्याचा हंगामी निर्णय घेतलेला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

## अमेरिकेच्या मालावर बहिष्कार घालण्याची मोहीम

इस्राइल आणि जॉर्डन ह्या देशांत सरहद्दीच्या भागात अस्वस्थ वातावरण उत्पन्न होऊन उभयपक्षी शस्त्रांचाही उपयोग करण्यात आला. ह्या राजकीय घडामोडींचा परिणाम म्हणून इस्राइल देशाशी संबंध ठेवणाऱ्या देशांविरुद्ध अरब राष्ट्रांत कटुता निर्माण झाली आहे. इस्राइल व जॉर्डन ह्यांच्या वादात भारताने जॉर्डनला पाठिंबा दिला आहे. परंतु त्याचा उपयोग न होता भारतीय कंपन्याही अरब देशांत अप्रिय होऊ पाहात आहेत. कोकाकोला हे अमेरिकेचे पेय प्रसिद्ध आहे. ते तयार करण्यासाठी लागणारे काही अर्क भारत अरब देशांना पुरविते. त्यामुळे ह्या कंपन्याही अरब देशांनी काळ्या यादीत घातल्या आहेत. भारताप्रमाणेच अमेरिकेवरही अरब देश नाराज झाले आहेत. इस्राइलवर आर्थिक बहिष्कार टाकण्याचा विचार करण्यासाठी कुवेत येथे अरब देशांच्या प्रतिनिधींची एक बैठक भरली होती. ह्या कमिटीने कोकाकोला ह्या अमेरिकन पेयावर बहिष्कार घालण्याची सूचना संबंधित राष्ट्रांना केली आहे. हे पेय तयार करणे, त्याचे वाटप करणे अगर ते पिणे अशा सर्व बाबी बहिष्काराच्या कक्षेत आहेत. अरब देशांत कोकाकोला कंपनीने सुमारे ३ कोटी डॉलर्सची भांडवल गुंतवणूक केली आहे. इजिप्तमधील बऱ्याच मोठ्या शहरांतून कंपनीच्या शाखा असून आस्वान धरणाच्या जागीही कोकाकोला बाटल्यांत भरण्याची व्यवस्था होत आहे. कैरो येथील फोर्ड कंपनीच्या मोटारकारखान्यांवरही बहिष्काराचे अस्त्र उगारण्यात आले आहे. अमेरिकेत ज्यू लोकांची संख्या मोठी असून ते लोक धनवानही आहेत. इस्राइल देशाला त्यांची कृतिशील सहानुभूती आहे.

## भिक्षेकऱ्यांत वीस वर्षांत सहापट वाढ

गेल्या २० वर्षांत महाराष्ट्रामध्ये भिक्षेकरी पुरुषांचे प्रमाण सहापट वाढले आहे, पण भिक्षेकरी स्त्रियांची संख्या मात्र त्या मानाने वाढलेली नाही, असे बेगर्स होम्ससंबंधीच्या एका चौकशी समितीला तपासणीअंती आढळून आले आहे.

## हिंदी बँकिंगविषयक तुलनात्मक आकडे

| | १९५१ | १९५६ | १९६१ | १९६३ | १९६५ |
|---|---|---|---|---|---|
| १. बँकांची संख्या | ५६६ | ४२३ | २९२ | २५२ | १०९ |
| (अ) शेडयूल्ड | ९२ | ८९ | ८२ | ७९ | ७६ |
| (ब) बिगर-शेडयूल्ड | ४७४ | ३३३ | २१० | १७३ | ३३ |
| २ बँकांच्या कचेऱ्या | ४,१५१ | ४,०६७ | ५,०१२ | ५,४९१ | ६,१३३ |
| (अ) शेडयूल्ड बँका | २,६४७ | २,९६६ | ४,३९० | ५,००४ | ५,९०४ |
| (ब) बिगर शेडयूल्ड बँका | १,५०४ | १,१०१ | ६२२ | ४८७ | २२९ |
| ३. प्रत्येक कचेरीमागील लोकसंख्या (000's रु.) | ८७ | ९८ | ८८ | ८३ | ७७ |
| ४. एकूण ठेवी (००,००० रु.) | ९०८,४७ | १,१५९,३६ | २,०११,५२ | २,४२०,२९ | ३,०७३,३६ |
| (अ) चालू " | ४५६,११ | ४५०,४५ | ५६७,५० | ६५५,३९ | ८०५,६८ |
| (ब) सेव्हिंग्ज " | १४९,३० | १९९,३६ | ३२७,९८ | ४६५,५५ | ६७७,८३ |
| (क) मुदती " | २५०,३६ | ३६६,२४ | ९४८,७२ | १,१४२,०९ | १,४४९,६२ |
| (ड) इतर " | ५२,७० | १४३,३१ | १६७,३२ | १५७,२६ | १४०,२३ |
| ५. प्रत्येक कचेरीमधील सरासरी ठेवी (००,००० रु.) | २२ | २९ | ४० | ४४ | ५० |
| (अ) शेडयूल्ड बँका " | ३२ | ३७ | ४५ | ४८ | ५२ |
| (ब) बिगर शेडयूल्ड बँका " | ५ | ७ | ६ | ७ | ११ |
| ६. दर माणशी ठेवी रु. | २५ | २९ | ४६ | ५३ | ६५ |
| ७. येणे कर्ज (००,००० रु.) | ६२६,९० | ८२४,१५ | १,२९३,१७ | १,६२२,१८ | २,१३०,२३ |
| (अ) शेडयूल्ड बँका " | ५८१,३९ | ७८१,६६ | १,२६८,१८ | १,६०४,४४ | २,११६,३६ |
| (ब) बिगर शेडयूल्ड बँका " | ४५,५१ | ४२,४९ | २४,९९ | १७,७४ | १३,८७ |
| ८. दर कचेरीगणिक कर्जे " | १५ | २० | २६ | ३० | ३५ |
| (अ) शेडयूल्ड बँका " | २२ | २६ | २९ | ३२ | ३६ |
| (ब) बिगर शेडयूल्ड बँका " | ३ | ४ | ४ | ४ | ६ |
| ९. दर माणशी कर्ज रु. | १७ | २१ | २९ | ३६ | ४५ |
| १०. राष्ट्रीय उत्पन्न (००,००० रु.) | ९,९७०,०० | ११,३१०,०० | १४,८००,०० | १७,२१०,०० | २०,४०९,०० |
| ११. राष्ट्रीय उत्पन्नाशी ठेवींचे प्रमाण % | ९ | १० | १४ | १४ | १५ |
| १२. वसूल भांडवल + रिझर्व्हज् (००,००० रु.) | ७५,१५ | ७२,२३ | ७६,३६ | ८८,४६ | ९५,४१ |
| (अ) शेडयूल्ड बँका " | ६१,७८ | ६०,१५ | ७०,५६ | ८३,२५ | ९३,२५ |
| (ब) बिगर शेडयूल्ड बँका " | १३,३७ | १२,०८ | ५,८० | ५,२१ | २,१६ |
| १३. वसूल भांडवल+रिझर्व्हज्चे ठेवीशी प्रमाण % | ९·७ | ६·७ | ४·१ | ४·० | ३·४ |
| १४. कर्जाचे ठेवीशी प्रमाण % | ६९·२ | ७२·० | ६४·३ | ६७·२ | ६९·४ |
| १५. कर्मचाऱ्यांची संख्या | ... | ७८,८५२ | १,१५,१०७ | १,३३,८२३ | १,५५,४२२ |
| १६. एकूण उत्पन्न (००,००० रु.) | ४५,३५ | ६४,८९ | १२४,०० | १६१,३३ | २४२,४९ |
| १७. एकूण खर्च " | ३२,३० | ५१,२७ | ९५,७३ | १३०,३३ | २०७,५२ |
| १८. कचेरी खर्च " | १५,४० | २१,७४ | ३५,८३ | ४९,१३ | ७३,५४ |
| १९. करापूर्वी नफा " | १३,०५ | १३,६२ | २८,२७ | ३१,०० | ३४,९८ |
| २०. करापूर्वी नफ्याचे वसूल भांडवल+ रिझर्व्हशी प्रमाण % | १२·२ | १६·८ | ३३·३ | ३०·१ | ३०·५ |

**इटलीची आणखी मदत**—बरौनी आणि नामरूप ह्या ठिकाणी दोन रासायनिक खताचे कारखाने काढण्यासाठी इटलीने आणखी ३ कोटी डॉलर्सची मदत देण्याचे कबूल केले आहे. दुर्गापूर आणि कोचीन येथील खत कारखान्यासाठी इटलीने ह्यापूर्वी मदत देऊ केलेली आहे. नव्या संकल्पित कारखान्यांची उत्पादनक्षमता दरसाल १ लाख, ६० हजार टन आहे. सर्व कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागातील आहेत.

**संरक्षणविषयक संशोधन**—भारताचे संरक्षणसाहित्य उत्पादन खात्याचे मंत्री श्री. थॉमस ह्यांनी अशी माहिती सांगितली आहे की संरक्षणविषयक प्रश्नाबाबत संशोधन करण्यात भारतामधील १२ हजार शास्त्रज्ञ खपत आहेत. संशोधनासाठी लागणाऱ्या १७ प्रयोगशाळा असून ह्या सर्व कामावर चालू वर्षी १० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

**गुजरात राज्यात खताचा कारखाना**—गुजरात राज्यात अमेरिकेच्या मदतीने आणखी एक खताचा कारखाना उभारण्यात येणार आहे. त्याच्या उभारणीसाठी ६० कोटी रुपये खर्च येणार असून तो कांडला अगर भावनगर ह्या ठिकाणी स्थापन होण्याची शक्यता आहे. कारखान्यासाठी ५०० एकर जागा लागेल. जपानच्या मदतीने कोयली तेल केंद्राजवळ एक खत कारखाना उभारण्यात येत आहे.

**ब्रिटनच्या युद्धकथेचा बोलपट**—पॅरामाउंट चित्रपट कंपनीने गेल्या महायुद्धातील ब्रिटनच्या युद्धकथेवर आधारित बोलपट काढण्याचे ठरविले आहे. ह्या बोलपटासाठी ८० लाख डॉलर्स खर्च करण्यात येत आहे. युद्धकथेचे चित्रण ब्रिटन व युरोपमध्येच करण्यात येणार आहे. एकाच चित्रपटावर इतका मोठा खर्च करण्याचा हा दुसरा प्रसंग आहे.

## चीनचे लढाऊ विमानांचे उत्पादन

सोव्हिएट रशियाच्या मिग १९ ह्या प्रकारची ३ ते ४ लढाऊ विमाने चीन दरमहा उत्पादन करीत आहे. ह्या विमानांच्या उत्पादनाला चीनने दीड वर्षापूर्वीच प्रारंभ केला असून त्यात काही सुधारणाही केल्या आहेत. जेटवर चालणाऱ्या चीनच्या ह्या विमानांचा वेग ध्वनिलहरींच्या दुप्पट आहे; व त्यातून अग्निबाण सोडण्याची व्यवस्था आहे. अलीकडे पूर्व पाकिस्तानात चीनची असल्या जातीची विमाने आढळून आली आहेत. चीनकडून आणखी मिग विमाने मिळविण्याच्या खटपटीत पाकिस्तान आहे. पाकिस्तानला सुमारे २५ विमाने चीनकडून मिळालेली आहेत. चीनने आतापर्यंत २०० मिग विमानांचे उत्पादन केले असावे असा अंदाज आहे. चीनच्या हवाई दलात मुख्यतः जुन्या पद्धतीच्या रशियन विमानांचा भरणा आहे. विमानांची एकूण संख्या ३ हजारांच्या आसपास आहे.

## नेवेली येथील वीजकेंद्राचा विस्तार

नेवेली येथील औष्णिक वीजकेंद्राचा विस्तार करण्यात येणार असून त्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीसंबंधी रशियाच्या निर्यात संघटनेशी करार करण्यात आला आहे. वीजकेंद्राच्या विस्ताराचा हा तिसरा टप्पा आहे. विस्ताराचे काम पूर्ण झाले म्हणजे केंद्रातील विजेचे उत्पादन ४०० मेगॅवॅट ऐवजी ६०० मेगॅवॅट होऊ लागेल. करारात ठरल्याप्रमाणे रशिया १५,१६० टन वजनाची यंत्रसामग्री पुरविणार आहे. त्याची रुबलमधील किंमत १.६९ कोटी रुबल्स अथवा १४ कोटी रुपये होईल. १९६१ मध्ये रशियाने भारताला दिलेल्या ११.२५ कोटी रुबल्सच्या कर्जातून यंत्रसामग्रीची किंमत देण्यात येईल. ह्या पूर्वीच्या दोन टप्प्यांसाठी रशियाने २१ कोटी रुपयांची यंत्रसामग्री पुरविलेली आहे. तिसऱ्या टप्प्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्री लवकरच येऊ लागेल. त्यासाठी एकूण ३० कोटी रुपये खर्च येणार आहे.

## बरौनी–कानपूर तेलवाहतुकीचे नळ

बरौनी येथील तेलशुद्धीच्या कारखान्यापासून कानपूरपर्यंत तेल वाहून नेणारे नळ टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. ह्या नळांची लांबी ६७४ किलोमीटर आहे. कारखान्यात तयार करण्यात आलेले १,७०० लिटर मोटारीचे इंधन प्रथम नळमार्गात सोडण्यात आले. ते पाटण्याला व मोगल सराईला निम्मे निम्मे वाटण्यात येईल. मोटारीच्या इंधनानंतर ह्याच नळांतून चांगल्या प्रतीचे केरोसीन आणि नंतर डिझेल तेल वाहून नेण्यात येईल. बरौनी ते हलदिआ ह्यांच्या दरम्यान नळ टाकण्याचे कामही पुरे होत आले आहे. काही महिन्यांत ते पुरे होईल. एका इटालियन कंपनीच्या आर्थिक व तांत्रिक साह्याने नळ टाकण्याचे काम करण्यात येत आहे. त्यासाठी सुमारे २७ कोटी रुपये खर्च येईल. भारतात जसजसे नवनवे खनिज तेलांचे साठे उपलब्ध होत जातील तसतसे तेलवाहतुकीचे नळही घालावे लागतील.

## प्रियाराधनाचे शिक्षण

रॉकडेल (इंग्लंड) येथील एका शाळेने आपल्या विद्यार्थ्यांना प्रियाराधनेचे शिक्षण देण्यास प्रारंभ केला आहे. विवाहाच्या आधी लैंगिक सुखाचा उपभोग घेण्यातील धोके तरुण-तरुणींना समजावून सांगितले जातील.

## आफ्रिका–आशियासाठी मार्शल योजना

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वॉशिंग्टन येथे भरलेल्या वार्षिक सभेत बोलताना मॅलेशियाच्या अर्थमंत्र्यांनी अशी सूचना केली की, आफ्रिका आणि आशिया खंडांतील गरीब देशांना मदत करण्यासाठी एका नव्या मार्शल योजनेचा उपक्रम सुरू करण्यात यावा. गेल्या महायुद्धानंतर युरोपमधील देशांची आर्थिक घडी पुन्हा बसविण्यासाठी मार्शल योजनेखाली मदत देण्यात आली होती. तिचा फार उपयोग झाला. कारण, युरोपमध्ये तांत्रिक व कारभारविषयक अनुभव उपलब्ध होता. तशी परिस्थिती आफ्रिकेची व आशियाची नाही. ह्या खंडांना फार मागासलेल्या अवस्थेतून प्रगती करावयाची आहे; आणि म्हणूनच मार्शल योजनेसारख्या साह्याची अधिक आवश्यकता आहे.

## चिकूच्या निर्यातीची योजना

बोर्डी शेतकरी सहकारी संस्थेने चिकू ह्या फळाची मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्याची एक योजना तयार केली आहे. ह्या बाबतीत महाराष्ट्रीय मार्केटिंग सोसायटीने जरूर ते साह्य करण्याची तयारी दाखविली आहे. शेतकरी सहकारी संस्थेचे अध्यक्ष श्री. सावे ह्यांनी ही माहिती संस्थेच्या वार्षिक सभेत सांगितली. ते म्हणाले की, चांगल्या प्रतीची चिकूची फळे ब्रिटन, फ्रान्स, स्विट्झरलंड व मध्यपूर्वेतील देशांना पाठविण्यात आली आहेत. तेथील बाजारपेठेचा अंदाज घेण्याचा हा पहिला प्रयत्न आहे.

## सरकारच्या मंत्र्यांचा परदेशी प्रवासाचा खर्च

मध्यवर्ती सरकारचे अनेक मंत्री कारणाकारणाने परदेशी प्रवासास जातात. १९६५ साली मध्यवर्ती सरकारचे २६ मंत्री परदेशांना भेटी देऊन आले. त्यांच्या प्रवासखर्चासाठी एकूण ५.४ लाख रुपयांचे परदेशीय चलन खर्चावे लागले. परराष्ट्रीय व्यवहारखात्याच्या त्या वेळच्या राज्यमंत्री श्रीमती लक्ष्मी मेनन ह्या ४ वेळा परदेशाला गेल्या होत्या. त्यांच्या प्रवासखर्चापोटी सर्वांत जास्त म्हणजे ६१,५४५ रुपये यावे लागले. त्यांच्या खालोखाल परराष्ट्रीय व्यवहारखात्याचे उपमंत्री श्री. दिनेश सिंग ह्यांनी परदेशभ्रमण केले. त्यांच्या प्रवासाचा खर्च ५५ हजार रुपये झाला. परराष्ट्रीय व्यवहारखात्याच्या तिघा मंत्र्यांच्या प्रवासासाठी सर्वांत जास्त म्हणजे १.४६ लाख रुपये खर्च करण्यात आले. संरक्षण-उत्पादनमंत्री श्री. थॉमस ह्यांच्या युगोस्लाव्हिआच्या भेटीच्या वेळी अवघे २८० रुपये खर्च झाले.

## एअर इंडियाबद्दल चिंता

एअर इंडियाला १९६५–६६ मध्ये १.६३ कोटी रु. नफा उरला; त्यापूर्वीच्या वर्षी तो ३.०४ कोटी रु. होता. जगातील विमान वहातुकीचे धंद्यास जे वर्ष फार उत्तम गेले, ते एअर इंडियाला अत्यंत वाईट गेले. मौंट ब्लँकवर गमावलेले बोइंग, नॅव्हिगेटर्सचा संप, परदेशी हुंडणावळीची अडचण, भारत-पाकिस्तान संघर्षाचा परिणाम, इत्यादींमुळे एअर इंडियाच्या उत्पन्नात घट होऊन खर्च कमी करता आला नाही. पाच ते दहा वर्षांत सुपरसॉनिक विमाने उतारूंना जो वेगवान व सुखाचा प्रवास उपलब्ध करून देतील, तो एअर इंडियाने सुपरसॉनिक विमाने घेतल्याखेरीज त्याला शक्य होणार नाही. त्याला प्रचंड खर्च लागेल. तो केला नाही, तर एअर इंडियाला फार वाईट दिवस येतील.

## अल्पबचत मोहिमेची प्रगती

चलनवाढीवरील एक तोडगा, ह्या दृष्टीने अल्पबचत मोहिमेस हिंदुस्थान सरकारने प्रारंभ केला. युद्धोत्तर काळातही ती मोहीम चालूच राहिली. जनतेत बचतीची सवय वाढावी आणि मध्यवर्ती व राज्य सरकारांना, विकास योजनांना पैसा मिळावा ह्यासाठी सर्व पंचवार्षिक योजनांत अल्पबचत मोहिमेची गती वाढविण्यावर भर दिलेला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट २२५ कोटी रुपयांचे होते, ते दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत ५०० कोटी रु. आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ६०० कोटी रु. झाले.

(१) पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट्स (२) क्युम्युलेटिव्ह टाईम डिपॉझिट स्कीम (३) १२ वर्षांची नॅशनल डिफेन्स सर्टिफिकेट्स (४) १० वर्षांची नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स (५) १५ वर्षांची ॲन्युइटी सर्टिफिकेट्स आणि (६) दहा वर्षांची डिफेन्स डिपॉझिट सर्टिफिकेट्स असे अल्प बचतीचे वेगवेगळे प्रकार आहेत. पहिले चार प्रकार पोस्ट ऑफिसांच्याच कक्षेतले असून शेवटच्या दोन प्रकारची सर्टिफिकिटे देण्याचा अधिकार रिझर्व्ह बँक, स्टेट बँक आणि तिच्या सबसिडिअरी बँका व ट्रेझऱ्या ह्यांना आहे. १० वर्षांची डिपॉझिट सर्टिफिकिटे पोस्टाच्या सेव्हिंग्ज बँकांनाहि देता येतात.

१९५४–५५ ते १९६५–६६ मध्ये अल्पबचतीच्या द्वारा जमा झालेल्या रकमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे—

(कोटी रु.)

| वर्ष | एकूण | वर्ष | एकूण |
|---|---|---|---|
| १९५४–५५ | ५५·५३ | १९६१–६२ | ८६·८३ |
| १९५५–५६ | ६६·९७ | १९६२–६३ | ७४·९१ |
| १९५६–५७ | ६१·७१ | १९६३–६४ | १२६·४५ |
| १९५७–५८ | ६९·२५ | १९६४–६५ | १२८·०० |
| १९५८–५९ | ७८·४४ | १९६५–६६ | १३८·६५ |
| १९५९–६० | ८७·९५ | | |
| १९६०–६१ | १०४·९८ | | |

अल्पबचतीच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आहे. त्याखालोखाल प. बंगालचा आहे. यू. पी., पंजाब आणि बिहार ह्यांसारख्या शेतीप्रधान राज्यांतून पो. ऑ. सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट्स अधिक लोकप्रिय आहेत. महाराष्ट्र, प. बंगाल आणि गुजरातसारख्या औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राज्यांतून नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटे अधिक लोकप्रिय आहेत.


## काश्मीरला जाणाऱ्या हौशी प्रवाशांत वाढ

गेल्या वर्षी भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान झालेल्या रणधुमाळीनंतर काश्मीरला जाणाऱ्या हौशी प्रवाशांची संख्या साहजिकच घटली होती. परंतु आता ती पुन्हा वाढू लागली आहे. गेल्या ऑक्टोबर महिनाअखेर १ लाख, १२ हजार हौशी प्रवासी काश्मीरला भेट देऊन गेले. प्रवाशांचा हा उच्चांक आहे. काश्मीरच्या राज्याच्या अर्थव्यवस्थेत प्रवाशांकडून मिळणाऱ्या उत्पन्नाला महत्त्वाचे स्थान आहे. हॉटेल्सचे मालक, खाजगी घरमालक, कलापूर्ण वस्तू करणारे कारागीर, दाल सरोवरातील बोटवाले, इत्यादी अनेक प्रकारच्या व्यावसायिकांना हौशी प्रवाशांकडून चांगली प्राप्ती होते. पुढीलवर्षी त्यांची संख्या दोन लाखांच्या घरात जाईल अशी अपेक्षा करण्यात येत आहे. राज्य सरकार वाढत्या प्रवाशांसाठी उपलब्ध असणाऱ्या सुखसोईंचा विस्तार करण्याकडे लक्ष देत आहे.




धूर म्हणजेच संकटाला आमंत्रण... परंतु
किर्लोस्कर डिझेल एंजिन
वापरण्याने धूरही होत नाही व
संकटेही उपस्थित होत नाहींत...

बहुधा, प्रत्येक दोन शेतकऱ्यांमागे एकतरी किर्लोस्कर डिझेल एंजिनचा मालक असतो.
शेतकरी व बागाइतदार यांना भरपूर पैसा मिळविण्यास मदत करणारे, असा लौकिक या अति उत्कृष्ट अशा किर्लोस्कर डिझेल एंजिनांच्या कार्यक्षमतेमुळे संपादन केला आहे.
बिनत्रासाची व अजोड कार्यक्षमता आपल्या उत्पादनांत अधिक भर घालील. शिवाय ती ठिकठिकाणी सहजरित्या हलविता येतात, इतकेच नव्हे तर त्यांतील यांत्रिक सुटे भाग बदलण्यास आपल्याला कुणावरही अवलंबून राहण्याची गरज पडत नाहीं. विक्रीनंतरची सेवा व सुटे भाग मिळण्याची हमी दिली आहे. ती निराळीच.



किर्लोस्कर
डिझेल एंजिन्स
२ ते १५ हॉर्स पॉवर
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.
एल्फिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)
TOM & BAY
KO: 467-A MAR

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
वसूल भांडवल ... रु. ११·९१ लाख
रिझर्व्ह व इतर फंडस् ... रु. १६·०८ ,,
ठेवी ... रु. ४३८·०२ ,,
खेळते भांडवल ... रु. ४९०·७३ ,,
शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

### आयुर्विम्याच्या धंद्यात झालेली वाढ


३१ मार्च १९६६ अखेरचा आयुर्विमा मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. अहवालातील माहितीप्रमाणे १९६५-६६ च्या वर्षात मंडळाने ७९८ कोटी रुपयांचा नवा धंदा मिळविला आहे. त्या मागील साली मंडळाने ७०१ कोटी रुपयांचा नवा धंदा मिळविला होता. अहवालाच्या वर्षी विमामंडळाने एकूण १० लाख ५६ हजार नवीन पॉलिसी विमेदारांना दिल्या. त्यापैकी ७०·४ टक्के पॉलिसी ज्यांनी आधी विमे उतरविलेले नव्हते अशा लोकांना देण्यात आल्या. ३५·९ टक्के विमे ग्रामीण भागांतील विमेदारांना देण्यात आले. अहवालाच्या वर्षअखेर चालू असलेल्या विमापत्रकांची संख्या १·१५९ कोटी होती. मागील वर्षाशी तुलना करता अहवालाच्या वर्षी १२·८ टक्क्याने धंद्याची वाढ झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आलें आहे. गेल्या १० वर्षांत विम्याच्या धंद्याची तिपटीपेक्षा अधिक वाढ झाली असून विमापत्रकांची संख्या दुपटीपेक्षा अधिक झाली आहे. १ सप्टेंबर १९५६ रोजी विमानिधीची रक्कम ३८०·६१ कोटी रुपये होती, ती ३१ मार्च १९६६ रोजी ९७७·५६ कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. म्हणजे विमानिधीत गेल्या १० वर्षांत १५७ टक्क्याने वाढ झाली. ह्या १० वर्षांच्या कालावधीत आयुर्विम्याच्या धंद्यासंबंधीची मंडळाची गुंतवणूकही अर्थातच वाढली आहे. सप्टेंबर १९५६ अखेर गुंतवणुकीची रक्कम ३४९·२९ कोटी रुपये होती ती मार्च १९६६ अखेर ९६१·०४ कोटी रुपयांपर्यंत वाढली. विम्याच्या हप्त्याचे उत्पन्न अहवालाच्या वर्षी १७९.७६ कोटी रुपये झाले. त्यामागील वर्षी हप्त्याचे उत्पन्न १६२·२५ कोटी रुपये झाले होते. मंडळाचे एकूण निव्वळ उत्पन्न २२४·५५ कोटी रुपये झाले.

---

### रेल्वे एंजिनांच्या कारखान्यासाठी कर्ज

वॉशिंग्टन येथील एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकने भारत सरकारला १·२७ कोटी डॉलर्सचे कर्ज मंजूर केले आहे. रुपयाच्या चलनांत कर्जाची रक्कम ९·५६ कोटी रुपये भरते. वाराणसी येथे डिझेल इलेक्ट्रिक रेल्वे एंजिने तयार करण्याचा कारखाना भारताने स्थापन केला आहे. ह्या कारखान्यात तयार होणारी एंजिने सवस्वी हदी बनावटीची असणार नाहीत. कारण एंजिनांसाठी लागणारे काही अत्यावश्यक भाग हिंदमध्ये अजून तयार करता येत नाहीत. बँकेने दिलेल्या कर्जाचा उपयोग जरूर ते भाग अमेरिकेत खरेदी करण्यासाठी व्हावयाचा आहे. वाराणसी येथील कारखान्यात तयार होणाऱ्या एंजिनांत त्यांचा वापर करण्यात येईल. वाराणसी येथील कारखान्यासाठी बँकेने दिलेले हे तिसरे कर्ज आहे. ह्यापूर्वी देण्यात आलेल्या दोन कर्जाचा उपयोग कारखान्याच्या उभारणीसाठी करण्यात आला. त्याशिवाय तेथे तयार होणाऱ्या १०९ डिझेल एंजिनांसाठी लागणारे भागही वरील कर्जातून विकत घेण्यात आले. नवीन कर्जाची परतफेड २० सहामाही हप्त्यांनी करावयाची आहे. कर्जफेडीला प्रारंभ १९६८ साली होणार असून देणे असलेल्या रकमेवर ६ टक्क्याने व्याजाची आकारणी करण्यात येणार आहे. येत्या दोन वर्षांत हिंदमधील रेल्वेसाठी २०० नवी एंजिने लागतील असा अंदाज बँकेच्या तज्ज्ञांनी केला आहे. त्या दृष्टीने वाराणसी येथील कारखाना स्वयंपूर्ण करण्यास बँक मदत देणार आहे. एका अमेरिकन कंपनीने हिंदी तंत्रज्ञांना प्रशिक्षण देण्याची तयारी दाखविली आहे. प्रशिक्षण कंपनीच्या अमेरिकेतील कारखान्यात व वाराणसी येथील कारखान्यात देण्यात येणार आहे.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
(विश्रामबाग — सांगली महाराष्ट्र)



# दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड

मुख्य कचेरी : सातारा (महाराष्ट्र)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २० लाख |
| वसूल भांडवल | रु. १२ लाखांचेवर |
| खेळते भांडवल | रु. ६ कोटी, ५० लाखांचेवर |
| गंगाजळी | रु. ८ लाख, ५० हजारांचेवर |
| ठेवी | रु. ५ कोटी, ५० लाखांचेवर |

शाखा सत्तावीस

मुदतठेवी आकर्षक व्याजाने स्वीकारल्या जातात.

रा. ना. गोडबोले, अध्यक्ष संचालक मंडळ
वि. श्री. दामले, जनरल मॅनेजर



श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट ग्लायकॉल ईथर्सचे उत्पादन करणार

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेडच्या संचालक मंडळाने नवीन उद्योगधंदा म्हणून शक्य झाल्यास देशातील अगर परदेशांतील उद्योगधंद्याबरोबर, व्यक्तीबरोबर व / अगर व्यक्तींबरोबर सहकार्य करून "ग्लायकॉल ईथर्सचे" उत्पादन करण्याचे योजिले आहे. त्याकरिता मुंबईचे एक उद्योगपती श्री. व्ही. एन्. सरदेसाई यांचेबरोबर कंपनी बोलणी करीत आहे. त्यांना मध्यवर्ती सरकारकडून ग्लायकॉल ईथर्स तयार करण्याचे अधिकारपत्र मिळाले आहे. सदरबाबत मे. डाउ केमिकल्स (अमेरिका) यांचेबरोबरही वाटाघाटी चालू आहेत. सदरप्रमाणे नवीन धंद्याकरिता सहकार्य मिळविण्याकरिता व अल्कोहोलला परदेशांमध्ये विक्रीकरिता किती वाव आहे,याचा अभ्यास करण्याकरिता म्हणून एक संचालक श्री. ज. चं. आगाशे यांनी श्री. व्ही. एन्. सरदेसाई यांच्यबरोबर अमेरिका व युरोपमधील काही देशांस सप्टेंबर-आक्टोबर १९६६ मध्ये भेटी दिल्या.

अल्कोहोलपासून तयार होणारी रसायने तयार करण्याचे दृष्टीने कंपनीने श्री. नी. स. भिडे, एम्. एस्सी. ह्यांची नेमणूक केलेली आहे आणि श्री. डॉ. व्ही. बी. चिकलपट्टी, डायरेक्टर, श्रीराम इन्स्टिटयूट फॉर इंडस्ट्रिअल रिसर्च, नवी दिल्ली, यांचाही कंपनी सल्ला घेत आहे. सदरप्रमाणे अल्कोहोलपासून तयार होणाऱ्या रसायनांचा बाजारांत खप होण्याचे दृष्टीने अभ्यास केल्यानंतर ह्या योजना हाती घेण्यात येतील. कमाल जमीन धारणा कायद्यामुळे कंपनीच्या आर्थिक परिस्थितीवर आलेला ताण कमी करण्यास ह्या योजनांमुळे मदत होईल अशी संचालक मंडळास आशा वाटते.

३० जून, १९६६ अखेरच्या वर्षी कंपनीला २,९३८ रु. निव्वळ नफा झाला आणि डिव्हिडंड रिझर्व्हमधून २,६७,५०० रु. घेऊन डिव्हिडंड देण्यात येणार आहे. (ऑर्डिनरी भागांवर करपात्र १०%).

### टेलिफोन बिलांची वाढती थकबाकी

भारतातील टेलिफोन बिलांची थकबाकी १ जुलै, १९६४ रोजी ४·५२ कोटी रु. होती, ती १ जुलै, १९६५ रोजी ६·०४ कोटी रु. झाली.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

सरदारगृह
मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमची वैशिष्ट्ये —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.
फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

श्री. वा. काळे ह्यांचीं
★ कौटुंबिक व सामाजिक पुस्तकें ★

| | |
|---|---|
| कण आणि क्षण | रु. ३ = ५० |
| पुढें पाऊल | रु. २ = ०० |
| तुमचें स्थान कोणतें ? | रु. २ = ०० |
| दाणे आणि खडे | रु. ३ = ०० |
| कौटुंबिक हितगुज | रु. ३ = ०० |
| जयां अंगीं मोठेंपण | रु. ३ = ०० |

★ अभिनव पुस्तक मंदिर, पुणें ४. ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] ७, सुभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२
( १ ) बचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००
( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध
( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.
अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## मॅनेजिंग एजन्सीच्या भागीदाराची डायरेक्टरपदी निवड कायदेशीर आहे

इंडिया युनायटेड मिल्स लि. च्या मॅनेजिंग एजन्सी फर्मचे एक भागीदार, श्री. नंदलाल मोरे ह्यांची कंपनीच्या संचालकपदी वार्षिक सभेत थोड्या मताधिक्याने निवडणूक झाली. कंपनीचा एक भागीदार, रामचंद्र सी. मीरचंदाणी, ह्यांनी बॉम्बे सिटी सिव्हिल कोर्टात दावा आणून मोरे ह्यांस संचालक म्हणून काम करण्यास मनाई करण्यात यावी अशी मागणी केली. अशा निवडणुकीला स्पेशल ठरावाची आवश्यकता आहे, असे कंपनी कायद्याचे २६१ ( १ ) हे कलम सांगते, असा त्यांचा युक्तिवाद होता. कोर्टाने हा दावा फेटाळला, तेव्हा हायकोर्टात अपील करण्यात आले. तेव्हा न्यायमूर्ती पटेलांनी वादीच्या बाजूने निवाडा केला; मोरे ह्यांच्या निवडणुकीस ऑर्डिनरी ठराव पुरणार नाही, असे त्यांनी सांगितले. त्यावर मोरे ह्यांनी लेटर्स पेटंट अपील केले, त्याचा निवाडा हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचने केला, आणि मीरचंदाणीचा दावा फेटाळला. भागीदाराची फर्म जेव्हा मॅनेजिंग एजंट असते, तेव्हा त्या फर्मचा प्रत्येक भागीदार स्वतंत्रपणे मॅनेजिंग एजंट असा समजावयाचा नाही; तेव्हा २६१ ( १ ) कलमातील ( अ ), ( ब ) किंवा ( क ) ह्या सदरांत मोरे बसत नाहीत; म्हणून त्यांच्या निवडणुकीस स्पेशल ठरावाची आवश्यकता नाही; त्यांची निवडणूक कायदेशीर आहे.

---

## दि स्टॅटर्डे ईव्हिनिंग पोस्ट

वरील इंग्रजी पाक्षिकाच्या खपाचे आकडे उद्बोधक आहेत. गेल्या १२ महिन्यांतील प्रत्येक अंकाची सरासरी छपाई ऑर्डर ७०,८१,००० प्रतींची होती. सरासरीने दर अंकाच्या ५,३८,५२६ प्रतींची रोख विक्री झाली; वर्गणी भरलेल्यांची संख्या ६२,३०,४९९ होती. अशा रीतीने, प्रत्येक अंकाच्या ६७,६९,०३५ प्रतींचे पैसे मिळाले. १,०६,२४८ प्रती मोफत वाटण्यात आल्या. ज्या प्रतींचा हिशोब लागला नाही, खराब झाल्या, ऑफिससाठी वापरल्या आणि शिल्लक राहिल्या अशा प्रतींची सरासरी संख्या २,०५,७१७ होती. आपल्याकडील उत्कृष्ट खपाच्या मासिकाच्या एकूण छापलेल्या प्रतींच्यापेक्षा दि सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्टच्या फुकट गेलेल्या प्रतींची संख्या आठपट आहे!

---

## वैद्यकीय तपासणीशिवायच्या विम्याच्या रकमेत वाढ

आयुर्विमा कॉर्पोरेशनने वैद्यकीय तपासणी केल्याशिवाय देण्यात येणाऱ्या विम्याच्या रकमेत १ नोव्हेंबरपासून वाढ केली आहे. ह्या योजनेप्रमाणे आतापर्यंत ३ हजारांचा विमा वैद्यकीय तपासणीशिवाय उतरता येत असे. आता ह्या रकमेची मर्यादा ४ हजारापर्यंत वाढविण्यात आली आहे. ग्रामीण भागात विमेदारांची वैद्यकीय तपासणी करण्याची सोय पुष्कळदा उपलब्ध नसते. त्यामुळे ग्रामीण भागात विम्याचा प्रसार करण्यात अडचणी येत होत्या. ह्या दूर करण्यासाठी १९६० सालापासून ही योजना चालू करण्यात आली आहे. ह्या सवलतीचा चांगला अनुभव आल्यामुळे अशा विम्याच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशाच प्रकाराची एक खास विमा योजना असून तिची रक्कम आतापर्यंत ५ हजार रु. होती. ही मर्यादा वाढवून आता ७,५०० रु. करण्यात आली आहे.

## स्वेच्छेच्या घटस्फोटाची शिफारस

विवाहबंधनाला किल्ल्याची उपमा देणारी एक रशियन म्हण आहे. ह्या किल्ल्यातील विवाहित लोक बाहेर पडण्याची खटपट करीत असतात, तर किल्ल्याबाहेरचे लोक आत शिरकाव करून घेण्यासाठी धडपड करीत असतात. ह्या उपमेतील विनोदाचा भाग सोडला, तर काही विशिष्ट परिस्थितीत लग्नाची बेडी तोडण्याची मुभा असावी असा कायदा सर्वच देशात असतो. तथापि, विवाहाचे जोखड मानेवरून दूर करण्यासाठी ज्या अटी पूर्ण कराव्या लागतात त्या पुष्कळदा जाचक असतात. त्यामुळे त्या अटी पूर्ण झाल्याचा देखावा करून घटस्फोट मिळविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. ब्रिटनमधील घटस्फोटविषयक कायद्याची अशीच काहीशी परिस्थिती झाली आहे, असे दिसते. घटस्फोट मिळविण्याची सध्याची कायदेशीर पद्धत पतिपत्नींना अतिशय त्रासदायक ठरत आहे. घटस्फोट मिळविण्यासाठी व्यभिचार अथवा मानसिक क्रौर्य ह्यासारखी खरीखोटी कारणेही मुद्दाम शोधून काढावी लागतात. ब्रिटनच्या कायदा कमिशनने ह्या गुंतागुंतीच्या परिस्थितीचा विचार करून घटस्फोटविषयक कायद्यात सुधारणा करण्यासाठी काही शिफारसी केल्या आहेत. त्यात एक शिफारस अशी आहे की पतिपत्नी ही दोघेही दोन वर्षांपर्यंत विभक्त राहिली तर त्यांना एकमेकांच्या संमतीने घटस्फोट देण्यात यावा. परंतु त्यांच्यापैकी एखाद्याचा घटस्फोटास विरोध असेल तर मात्र विभक्त राहण्याची कालमर्यादा पाच ते सात वर्षांची असावी. कमिशनच्या शिफारसी सरकारने मान्य केल्या तर मनाने एकमेकापासून दुरावलेल्या अनेक स्त्री-पुरुषांची वैवाहिक शृंखलातून सुलभतेने सुटका होईल, आणि अयशस्वी झालेल्या विवाहांची निरगाठ घटस्फोटाच्या कात्रीने कापली जाईल.

---


## अमेरिकेकडे धान्याच्या मदतीची मागणी

१९६७ सालच्या पहिल्या सहा महिन्यांसाठी भारताने अमेरिकेकडे ३७ लाख टन अन्नधान्याची मागणी केली आहे. ह्या धान्यात गहू आणि तांबडा जोधळा ह्यांचा समावेश आहे. त्याशिवाय चालू वर्षासाठी २० लाख टन अन्नधान्याची मागणीही करण्यात आली आहे. म्हणजे सध्या एकूण ५७ लाख टन अन्नधान्याची मागणी करण्यात आली आहे. खरीपाची व रब्बीची पिके नेहमाप्रमाणे हाती लागली तर १९६७ च्या दुसऱ्या सहामाहीसाठी फक्त ४० लाख टनच धान्य मागवावे लागेल. चालू साली रशियात अन्नधान्याची भरघोस पिके आल्याच्या वार्ता आहेत. ते खरे असेल तर रशियाला परदेशाकडून, विशेषतः कॅनडाकडून गव्हाची आयात करावी लागणार नाही आणि भारताला गहू मिळण्याची शक्यता वाढेल. रशिया कॅनडाकडून ८० ते ९० लाख टन गहू तीन वर्षांत आयात करणार होता. भारताने रशियाकडेही गव्हाबद्दल चौकशी चालविली आहे.

---

## प्रिन्स चार्लसच्या उत्पन्नवाढीस विरोध

प्रिन्स चार्लस १४ नोव्हेंबर, १९६६ रोजी १८ वर्षांचा झाला आणि डची ऑफ कॉर्नवालचे त्याचे वार्षिक उत्पन्न १५,००० पौंडांचे ३०,००० पौंड झाले. त्याचा निषेध करणारा एक ठराव सात मजूर पक्षीय सभासदांनी कॉमन्स सभेत मांडला आहे. ब्रिटिश सरकारने पगार व उत्पन्न ह्यांवर घातलेले बंधन राजघराण्यातील लोकांवरही बंधनकारक आहे, असे ठरावात म्हटले आहे.




नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

# ठाकरसी फॅब्रिक्स

फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड ·SANFORIZED·





**ठाकरसी ग्रूप**

- धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

## बँकेच्या शाखाधिकार्‍यांसाठी एक प्रश्न

'युको टॉवर' मध्ये यु. क. बँकेने आपल्या मॅनेजरांना उद्देशून एक प्रश्न विचारला व सर्वांत मुद्देसूद उत्तराला ५० रु. चे बक्षीस जाहीर केले. प्रश्न असा होता—

भारत ट्रेडिंग कंपनीचा सोल प्रोप्रायटर लाला हरिराम ह्याने तुमच्या शाखेकडे १५,००० रुपयांचा क्लीन ॲडव्हान्स मागितला आहे. तो स्वतः आणि त्याची पत्नी ह्यांच्या जोड नावाने आपल्या शाखेत ३ वर्षांच्या मुदतठेवीत २०,००० रुपये ठेवण्यास, ह्या ठेवीचे तारणावर कर्ज मिळणार असेल तर, तयार आहे.

बँकेला जनरल लीन आहेच, म्हणून मुदतठेवीची पावती डिसचार्ज करून ती शाखेच्या स्वाधीन करण्याची त्याला आवश्यकता वाटत नाही. लाला हरिरामाचा अर्ज मंजूर करावा काय? कर्ज मंजूर केलेच तर ते सिक्युअर्ड समजावे की अन् सिक्युअर्ड? 'इंटर-बँक ॲग्रीमेंट ऑन मिनिमम रेट्स ऑफ इंटरेस्ट ऑन ॲडव्हान्सेस' प्रमाणे कर्जावर व्याजाचा दर काय राहील?

### बक्षिसाचे उत्तर

भारत ट्रेडिंग कंपनीचा सोल प्रोप्रायटर लाला हरिराम ह्याचा अर्ज मान्य करता येणार नाही; कारण त्याने देऊ केलेले तारण त्याच्या एकट्याच्या नावावर नाही किंवा त्याच्या फर्मच्या नावावर नाही. मुदती ठेवीवर बँकेला जनरल लीन आहे, पण त्या लीनचा अधिकार वापरायचा झाला तर त्या व्यवहाराचे पोटीच दुसरा व्यवहार व्हायला हवा. अधिकार आणि जबाबदारी ह्यांचे परस्पर नाते असायला हवे. कर्जदाराच्या एकट्याच्या नावानेच जर मुदती ठेव असती, तर बँक आपला आधिकार वापरू शकती. प्रस्तुत प्रकरणात, मुदती ठेव हरिराम आणि त्याची पत्नी ह्या दोघांच्या नावाने आहे आणि कर्ज द्यावयाचे आहे ज्या फर्मला, त्याचा एक जॉइंट ठेवीदार सोल प्रोप्रायटर आहे. अशा कर्जाचे बाबतीत बँकेला मुदती ठेव सेट-ऑफ करता येणार नाही; मुदती ठेव फर्मचा सोल प्रोप्रायटर आणि त्यांची पत्नी ह्यांच्या जोडनावाने आहे.

दोघाहि जॉइंट ठेवीदारांनी ठेवीची पावती डिसचार्ज करून दिली आणि ठराविक कागदपत्र करून दिले तर मुदती ठेवीच्या तारणावर कर्ज देता येईल. प्रस्तुत प्रकरणी, अशा रीतीने डिसचार्ज केलेली पावती तारण देण्यास हरिराम तयार नाही तेव्हां त्याला कर्ज देता येणार नाही. अर्थात, सबंध कर्जास कर्जदार लायक आहे आणि तारणाची आवश्यकताच नाही असे मुख्य कचेरीला वाटले तर क्लीन अडव्हान्सला हरकत नाही.

रिझर्व्ह बँकेने कर्जावरील व्याजाचा कमाल दर १०% ठरवून दिला आहे आणि इंटर बँक कराराप्रमाणे तो बँक रेटपेक्षा किमान २% अधिक असायला हवा. बँक रेट ६% आहे तेव्हा आकारावयाचे व्याज ८% पेक्षा कमी असणार नाही. मुदती ठेव तारण म्हणून दिली, तरी ती कर्जदाराच्या नावावर नसल्यामुळे ठेवीवरील व्याजाच्या दरापेक्षा १% जास्त दराने कर्ज द्यावे हा नियम येथे लागू पडणार नाही. क्लीन ॲडव्हान्सवर सामान्यतः १०% व्याज आकारले जाते तोच दर कर्ज मंजूर झाल्यास येथे लागू करावा.

## लंडनमधील गांधीजींचा पुतळा

लंडनमधील महात्मा गांधींच्या पुतळ्यासाठी ब्रिटिश सरकार ४,००० पौंडांची (८४,००० रुपयांची) मदत देणार आहे. पुतळ्याच्या कामास प्रारंभ झाला असून टॅव्हिस्टॉक स्क्वेअरमध्ये त्याचे अनावरण १९६७ च्या प्रारंभी होईल.

## समान नावाच्या अर्बन सहकारी बँका

समान नावाच्या अनेक अर्बन बँका असल्यामुळे घोटाळा निर्माण होतो. त्यांची यादी करतांना त्यांच्या ठिकाणाचे नाव बँकेच्या नावाला जोडावे लागते; फक्त "अर्बन को. बँक लि." असे लिहिले, तर कोणती बँक समजावी? सांगलीची, उस्मानाबादची का अंबेची? समान नावामुळे कधी कधी हिशोबातही चूक होते आणि भलत्या बँकेत पैसे जमा-नावे केले जातात. ह्यासाठी, बँकेच्या ठिकाणाचे नाव बँकेच्या नावास प्रारंभी जोडण्यात यावे; नव्या नोंदणीच्या वेळी तर त्याकडे कटाक्षाने लक्ष देण्यात यावे, असे सुचविण्यात आले आहे. महाराष्ट्रातील समान नावाच्या अर्बन सहकारी बँकांची यादी सोबत जोडली आहे.

| | बँकेचे नाव | ठिकाण |
|---|---|---|
| १ | दि नागरिक सहकारी बँक लि. | भिवंडी |
| २ | " | कोंढीली |
| ३ | दि जनता सहकारी बँक लि. | नंदुरबार |
| ४ | " | पुणे |
| ५ | " | कऱ्हाड |
| ६ | " | सातारा |
| ७ | " | सांगली |
| ८ | " | बुलढाणा |
| ९ | दि मर्चंट्स को. बँक लि. | धुळे |
| १० | " | पंढरपूर |
| ११ | दि पीपल्स को. बँक लि. | शहादे |
| १२ | " | अमरावती |
| १३ | " | औरंगाबाद |
| १४ | दि अर्बन को. बँक लि. | सांगली |
| १५ | " | उस्मानाबाद |
| १६ | " | अंबे |
| १७ | दि जनता को. अर्बन बँक लि. | भोर |
| १८ | " | गावराई |

## खनिज संपत्तीच्या शोधात सहकार्य

भारतात सापडू शकणाऱ्या लोहेतर खनिजांचा शोध करण्याच्या कामी आधुनिक तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. अद्ययावत् शास्त्रीय उपकरणे बसविलेल्या विमानांच्या साह्याने खनिज संपत्तीची पाहणी करण्याची योजना आखण्यात यावयाची आहे. त्यासाठी रशियन तंत्रज्ञांची एक तुकडी लवकरच भारतात येणार आहे. रशियन तज्ज्ञ हिंदी तज्ज्ञांशी पाहणीसंबंधी प्राथमिक स्वरूपाची बोलणी करतील. गेल्या साली अमेरिकेच्या मदतीने अशी पाहणी करण्याचे घाटत होते. खनिज संपत्ती सापडण्याचा संभव असलेल्या ५ लाख ७० हजार चौरस किलोमीटर भूभागाची पाहणी विमानांच्या साह्याने करण्यात येईल. पाहणीचे काम ५ वर्षे चालेल. पाहणीसाठी लागणारी यांत्रिक उपकरणे रशिया पुरविणार आहे. योजना पार पाडण्यासाठी ७२८ लाख रुपये खर्च येईल. त्यापैकी १७२ लाख परदेशीय चलनात करावा लागेल.

## सिलोनला विमानाने टेलिफोन्स पाठवले

सिलोनच्या टेलिफोन खात्याला ३०० टेलिफोन्स विमानमार्गे तांतडीने पाठविण्यात आले. सिलोन सरकारने इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज कंपनीकडे २ हजार टेलिफोन्सची मागणी नोंदविली आहे. १९६३ पासून भारत सीलोनला टेलिफोनची सामग्री पुरवीत आहे.

★★★★★★★

(SCG-I HIN)

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ७६१०२

★★★★★★★★


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.